# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

## दि. ०९/०६/२०११ रोजी झालेल्या मंडळाच्या २६७ व्या बैठकीचे ठराव.

**बाब क्र. २६७/१ :- दि. २०.०५.२०११ रोजी झालेल्या २६६ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करणे,**

दि. २०/०५/२०११ रोजीच्या मुंबई मंडळाच्या २६६ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी करण्याचा प्रस्ताव सभागृहासमोर सादर केला. पृष्ठ क्र. २३३ वरील बाब क्र. २६६/२८ मधील दुस-या परिच्छेदात व पृष्ठ क्र. २३७ ठराव क्र. २६६/२९६१ दिनांक २०/०५/२०११ मधील दुस-या परिच्छेदात इमारतीचे अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ ८८०९.०० चौ.मी. ऐवजी २८०९.०० चौ.मी. अशी दुरुस्ती नंतर मुंबई मंडळाच्या दि. २०/०५/२०११ रोजीच्या २६६ व्या बैठकीचे कार्यवृत्त स्थायी केले.

**बाब क्र. २६७/२ :- पंतनगर घाटकोपर (पूर्व) या म्हाडा वसाहतीतील इ.क्र.७, पंतनगर प्रीती को.ऑ.हौ.सो.लि., न.भू.क्र.५६८१ (भाग) (पै), घाटकोपर किरोळ (पूर्व) च्या पुनर्विकासाकरीता सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) नुसार म्हाडाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर झालेला प्रस्ताव.**

**ठराव क्र. २६७/२९६२** **दिनांक :- ०९/०६/२०११**

**पंतनगर घाटकोपर (पूर्व) या म्हाडा वसाहतीतील इ.क्र.७, पंतनगर प्रीती को.ऑ.हौ.सो.लि.,** या संस्थेच्या प्रस्तावास अनुसरुन,

१. संस्थेकडून दि.२०/०९/१० नंतर म्हणजे दि.२३/०९/१० रोजी मंडळाकडे प्रस्ताव प्राप्त झाला आहे.सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५) २ सी(I) व २ सी(II) नुसार छाननी केली असता, बांधकाम क्षेत्रफळ वर्धनक्षम होत नाही.

म्हाडाचा ठराव क्र.६५०७,दि.२०/०९/२०१० च्या अधिन राहून मुंबई मंडळ या प्रस्तावात सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३(५) २ सी(I) प्रमाणे बांधकाम

क्षेत्रफळाऐवजी २ सी(II) प्रमाणे अधिमुल्य स्विकारण्याची शिफारस मुंबई मंडळ मा.उपाध्यक्ष/प्रा. यांचेकडे करीत आहे.

२. संस्थेच्या अभिहस्तांतरणानुसार ६९१.९१ चौ.मी. + अतिरीक्त जागा २८५.९६ चौ.मी. असे एकूण ९७७.८७ चौ.मी. क्षेत्रफळ आहे. सदरहू भूखंडावर २.५ चटईक्षेत्र निर्देशांकाप्रमाणे २४४४.६७ चौ.मी. एकूण बांधकाम क्षेत्रफळ आहे. यामधून अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ ९२२.२० चौ.मी. + दि.१९/०४/०२ रोजी ना हरकत प्रमाणपत्राद्वारे वितरीत केलेले १४२४.७० चौ.मी. असे एकूण २३४६.९० चौ.मी. वजा करता,उर्वरित ९७.७७ चौ.मी. क्षेत्रफळ वितरीत करता येते.

संस्थेने मागणी केल्याप्रमाणे उर्वरित ९७.७७ चौ.मी. चटईक्षेत्रफळ रहिवासी वापरासाठी म्हाडाचा ठराव क्र. ६२६० अन्वये रेडि रेकनर २०११ दराच्या ४०% (रु. ३०,३००/- च्या ४० % दराने म्हणजेच रु. १२,१२०/- प्रती चौ.मी.) दराने खालील अटीशर्तींवर वितरीत करण्यास मुंबई मंडळ मा.उपाध्यक्ष/प्रा. यांचेकडे शिफारस करीत आहे.

अ. संस्थेने विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत मुंबई म.न.पा. च्या इमारत प्रस्ताव विभागातर्फे आवश्यक त्या सर्व मंजू-या प्राप्त करण्याची जबाबदारी विषयांकित संस्था, विकासक आणि संस्थेच्या वास्तुशास्त्रज्ञावर राहिल.

ब. संस्थेने प्रस्तावासोबत सादर न केलेली कागदपत्रे ना हरकत प्रमाणपत्रापूर्वी सादर करणे आवश्यक राहील.

क. संस्थेने सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) मधील नियम (५) अन्वये मुंबई पालिकेच्या संबंधित इमारत प्रस्ताव विभागाकडे अतिरीक्त चटई क्षेत्रफळाच्या अधिमुल्याच्या १२.५% ऐवढी रक्कम (रु.१,४८,१२२/-) ऑफसाईट इन्फ्रास्ट्रक्चर फी मुंबई मंडळाच्या ना हरकत प्रमाणपत्रापुर्वी परस्पर भरणा करणे आवश्यक राहिल.

सदरहु बैठकीचे कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता मुंबई मंडळ मंजुर ठरावानुसार पुढील कार्यवाही करण्यास प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.

**बाब क्र.२६७/३ :- सर्वोदयनगर मजासवाडी  या म्हाडा वसाहतीतील एकुण १९ सह. ग्रुह. संस्थानी  मजासवाडी  सर्वोदयनगर सह. ग्रुह. संस्था महासंघ मर्या यांना पुनर्विकासाकरीता सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) नुसार म्हाडाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सादर झालेला प्रस्ताव.**

**ठराव क्र. २६७/२९६३                                    दिनांक :-०९/०६/२०११.**

**सर्वोदयनगर मजासवाडी  या म्हाडा वसाहतीतील एकुण १९ सह. गृह. संस्थानी मजासवाडी  सर्वोदयनगर सह. गृह. संस्था महासंघ मर्या**,संस्थेने मागणी केल्यानुसार,

संस्थेच्या १३० इमारतींच्या अस्तित्वातील बांधकाम क्षेत्रफळ ११४६०.३३ चौ.मी. क्षेत्रफळाच्या पुर्नबांधणीकरीता ना हरकत प्रमाणपत्र खालील अटी/शर्तीस अधिन राहून मुंबई मंडळ मान्यता देत आहे.

संस्था २.५ चटईक्षेत्र निर्देशांकाप्रमाणे अतिरीक्त चटई क्षेत्रफळासाठी प्रस्ताव सादर केल्यास, मुंबई मंडळाच्या २६५ व्या बैठकीत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दांची पूर्तता करुन ठराव क्र.२९३३ सर्व त्रुटींची पूर्तता करुन,प्रस्तावावर पुढील कार्यवाही करावी बाब क्र. २६७/०३ चर्चेनुसार आणि केलेल्या कार्यवाहीबाबतचा सविस्तर अहवाल मुंबई मंडळाच्या माहितीसाठी सादर करावा.

संस्थेला अस्तित्वातील बांधकाम क्षेत्राबाबत  देकार पत्र जारी करण्यात यावे.संस्थेने देकार पत्रात नमूद केलेली आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर,ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही जारी करण्यात यावी.

सदरहु बैठकीचे कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता मुंबई मंडळ मंजुर ठरावानुसार पुढील कार्यवाही करण्यास प्रशासनास अनुमती देत आहे.

ठराव एकमताने मंजूर.